**प्रतिवादी क्र. १ ते ४ अणि ६ तर्फे सुविद्य विधीज्ञ श्री. एस. आर. पवार यांच्यामार्फत वादीचा पुन्हा शपथेवर उलटतपास सुरू.**

**१७.** हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १४.०१.१९८८ रोजी जे वाटपपत्र झाले त्या वाटपपत्राची नोंद फेरफार क्रमांक अ/१३८७ अन्वये मिळकतीच्या ७/१२ पत्रकी झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १४.०१.१९८८ रोजीच्या वाटपपत्राप्रमाणे आलेले क्षेत्र माझे वडिल वहिवाटीत होते. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १४.०१.१९८८ रोजीच्या वाटपपत्राप्रमाणे रविंद्र व मारूती यांच्या वाटणीस आलेले क्षेत्र हे दोघेही वाहिवाटीत आहेत. आता मला नि.क्र.३/४ वरील दिनांक १४.०१.१९८८ रोजीच्या वाटणीपत्राची प्रमाणीत प्रत दाखविण्यात आली. ते वाटपपत्र हरीभाऊ गोविंदा जाधव, मानसिंग हरीभाऊ जाधव, मारूती हरीभाऊ जाधव व रविंद्र हरीभाऊ जाधव यांच्यामध्ये झालेले आहे. हरीभाऊ यांना गट क्रमांक ४१४ मधील आठ आणे हिस्सा विभागून आलेला आहे. मानसिंग हरीभाऊ जाधव हे माझे वडिल आहेत. मला नि.क्र.३/४ वरील दिनांक १४.०१.१९८८ रोजीचे नोंदणीकृत वाटणीपत्राचा दस्त व त्यातील संपुर्ण मजकूर मान्य व कबुल आहे. सदर साक्षीदाराने दिनांक १४.०१.१९८८ रोजीचा नोंदणीकृत वाटणीपत्राचा दस्त व त्यातील मजकूर मान्य केल्याने त्यास **नि.क्र.६५** देण्यात येत आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.६५ वरील वाटपपत्राचा दस्त मला व माझे वडिलांना मान्य असल्यामुळे आम्ही दोघांनीही आज अखेर ते वाटणीपत्र कोठेही आव्हानित केलेले नाही.

**१८.** हे म्हणणे खरे नाही की, रविंद्र, कृष्णाबाई आणि हरीभाऊ हे एकत्रात रहात होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ व २ यांची हरीभाऊ यांची चांगल्या प्रकारे सेवा शुश्रुषा केलेली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांनी माझ्या आज्ञी व आजोबांना कोणत्याही प्रकारची मदत केलेली नव्हती. माझ्या वडिलांनी माझ्या आज्ञी व आजोबांना मदत केली असे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा मी दाखल करू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, हरीभाऊ यांना वाटून आलेल्या हिश्शाचे त्यांनी दिनांक १२.०८.१९९४ रोजी प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या हक्कात मृत्यूपत्र करून दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, मृत्यूपत्र झालेले आहे. हे

म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दिनांक १२.०८.१९९४ रोजीच्या मृत्यूपत्राची नोंद होणेसाठी तलाठी यांच्या अर्ज दिला असता माझ्या वडिलांनी त्या नोंदीवर तक्रार अर्ज देवून हरकत घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, मंडल अधिकारी यांनी माझ्या वडिलांनी दाखल केलेला तक्रार अर्ज फेटाळलेला होता.

**<u>प्रश्न-</u>** उप-विभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी, आयुक्त यांच्याकडे दाखल केलेले तक्रार अर्ज नामंजूर केलेले होते ?

**<u>उत्तर-</u>** संबंधित अधिकारी यांनी ते न्याय देवू शकत नाहीत, तुम्ही कोर्टात दाद मागा असे सांगितले.

**१९.** मला माझ्या पुराव्याच्या शपथपत्रामधील परिच्छेद कलम ६ व ७ मध्ये निश्चित काय मजकूर लिहीलेला आहे तो आठवत नाही. माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील परिच्छेद कलम ६ व ७ मधील मजकूर माझे सांगणेप्रमाणे नमुद केलेला होता.

**२०.** हे म्हणणे खरे आहे की, अनुसया जाधव या प्रस्तुत दाव्यात वादी किंवा प्रतिवादी नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, अनुसया जाधव ही माझी आई असून तिने मला प्रस्तुत दाव्यात कथने मांडावयाचा वटमुखत्यार म्हणून अधिकार दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मानसिंग याने हरीभाऊ याने प्रतिवादी क्र. १ व २ यांना करून दिलेले मृत्यूपत्र रद्द करून मागणेसाठी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. मी प्रस्तुत दाव्यात अनुसया यांच्या वतीने प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दोन आणे आठ पै हिश्शाचे खरेदीपत्र करू देण्याची कसलीही मागणी केलेली नाही. मला एखाद्या मिळकतीची १००/- पेक्षा जास्तीची किंमत असल्याचे त्याची नोंदणीकृत खरेदीपत्र करावयाची आहे ही कायदेशीर बाब माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०२.११.२०११ रोजीचा दस्तऐवज हा रजिस्टर केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, हरीभाऊ यांना दिनांक १४.०१.१९८८ रोजीच्या वाटपामध्ये आठ आणेचे क्षेत्र आलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, हरीभाऊ यांना तीन मुले व चार मुली असे कायदेशीर वारस आहेत. हे म्हणणे खरे

आहे की, आठ आणेचा हिस्सा सात जणांमध्ये विभागणी केल्यास प्रत्येकाला २ आणे ८ पै हिस्सा येत नाही.

२१. आता मला माझ्या पुराव्याच्या शपथपत्रामधील परिच्छेद क्रमांक ५ मधील मजकूर "दरम्यानच्या कालावधीत म्हणजे, दिनांक ०२.११.२०११ रोजी पासून....ते सदरच्या स्टॅम्पपेपरला निशाणी देण्यात येवून तो पुराव्याकामी वाचण्यात यावा" हा वाचून दाखविला. सदरचा मजकूर हा माझी आई अनुसया जाधव यांच्याबाबतीत व स्टॅम्पच्या बाबतीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या मजकूराचा प्रस्तुत दाव्याशी काहीएक हितसंबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई अनुसया हिने दिनांक ०२.११.२०११ रोजीच्या स्टॅम्पवर कोठेही खरेदीपत्र करून मागितलेले नाही. माझ्या आईस प्रस्तुत दाव्याची माहिती आहे. माझ्या आईस प्रतिवादी क्र. १ व २ यांनी काय कैफियत दिलेली आहे याबाबत काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मारूती व रविंद्र यांनी त्यांच्या कैफियतीमध्ये दिनांक ०२.११.२०११ रोजीच्या स्टॅम्पमधील मजकूर नाकारलेला आहे. मी माझ्या आई-वडिलांना मारूती व रविंद्र यांनी त्यांच्या कैफियती मधील दिनांक ०२.११.२०११ रोजीच्या स्टॅम्पपेपवरील मजकूर नाकारलेला आहे याची माहिती दिलेली आहे. माझी आई अनुसया ही फेब्रुवारी २०१९ रोजी मयत झालेली आहे. माझ्या आईच्या मृत्यूनंतर मी, माझा भाऊ व माझे वडिल असे कायदेशीर वारस आहेत. मला व माझ्या वडिलांना प्रतिवादींनी दिनांक ०२.११.२०११ रोजीच्या स्टॅम्पमधील मजकूर नाकारलेला आहे याची माहिती आहे. माझ्या भावाला देखील प्रस्तुत दाव्याची माहिती आहे.

२२. मी प्रस्तुत दाव्यात अर्जुन कृष्णात जाधव हा मृत्यूपत्रावरील साक्षीदार दिनांक १८.०९.१९९२ रोजी मयत झालेला असे दाखविणारे त्याच्या मृत्यूचा दाखला निशाणी क्रमांक ५३ वर दाखल केलेला आहे. आता मला माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील परिच्छेद क्रमांक ५ मधील मजकूर "दावा मिळकतीच्या संदर्भाने प्रतिवादी क्र. १ व २ यांनी....ते याकामी पुराव्याकामी वाचण्यात यावा" हा वाचून दाखविला. सदरचा मजकूर माझ्या वादपत्रात नमुद

केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वाई नगरपरिषद वाई यांच्या कडील जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी यांच्याशी संगणमत करून अर्जुन कृष्णात जाधव यांचा खोटा मृत्यूचा दाखला दाखल केलेला आहे.

२३. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्या मिळकतीचे प्रोबेट करावयाचे व कोणत्या मिळकतीचे प्रोबेट करावयाचे नाही याबाबतचे कायदेशीर ज्ञान मला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी मिळकतीच्या प्रोबेट बाबतचा मजकूर माझ्या विधीज्ञांच्या सांगण्यावरून नमुद केलेला आहे. माझे वडिल घरात हिंडून-फिरून आहेत. माझे वडिल न्यायालयात येवून साक्ष देवू शकत नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडिल न्यायालयात येवून साक्ष देवू शकत नाहीत असे दाखविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा मी प्रस्तुत कामी दाव्यात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी वाई येथील न्यायालयात प्रतिवादी क्र. १ मारूती हरीभाऊ जाधव यांच्या विरुध्द गहाणखताबाबत दावा दाखल केलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझा प्रतिवादी क्र. १ मारूती हरीभाऊ जाधव यांच्याशी त्या गहाण दिलेल्या मिळकतीबाबत वाद झालेला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्याबाबत आमच्यामध्ये फौजदारी खटले दाखल झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या गहाण दिलेल्या मिळकतीवरून आमच्यामध्ये पहिल्यांना फौजदारी खटले दाखल झाले व त्यानंतर त्या मिळकतीबाबत दिवाणी स्वरूपाचे खटले दाखल झाले व त्यानंतर प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे मारूतीशी चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझा हरीभाऊ यांनी प्रतिवादी क्र. १ व २ यांना करून दिलेल्या मृत्यूपत्रातील मिळकतीशी काहीही हक्क व हितसंबंध नसताना खोटा दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. उलटतपास पुर्ण, फेरतपास नाही.

समक्ष / श्रवणोत्तर स्विकृत

SHRIJA RAJENDRA SHINDE

Digitally signed by SHRIJA RAJENDRA SHINDE
Date: 2025.06.24 16:36:17 +0530

(श्रीमती एस.आर.शिंदे)
सह दिवाणी न्यायाधिश क-स्तर
वाई.

दिनांकः- २४.०६.२०२५.

रे.दि.मु.नं. १४७/२०१८
निशाणी क्र. ४७ व ६२.